स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवी २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

वास्तव ई पेपर वाचा http://epaper.beedvastav.com

● बीड ● शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ४८ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# टोपलं भर शेण खाणाऱ्यांनी दुसऱ्यांवर टीका करू नये !! उबाठाने बाण बाजूला करत परभणीत खान निवडला -नवनाथ बन

- चंद्रपूर मनपामध्ये कोणी शेण खाल्ले यापेक्षा 2019 मध्ये पहिल्यांदा शेण खाण्याचे काम संजय राऊत आणि उबाठाने केले!!
- जेव्हा 50 खोक्यांचे आरोप केले, त्यावेळी संजय राऊत तिथे पैसे मोजून देण्यासाठी बसले होते का ?
- संजय राऊत पाटकर फाईल आली तर तुम्हाला तोंड दाखवायला जागा मिळणार नाही. तर अलिबागमध्ये केलेले कारनामे समोर येतील!

## 2019 मध्ये राऊतांनी पहिल्यांदा शेण खाल्ले : भाजपा प्रवक्ते नवनाथ बन

**मुंबई : प्रतिनिधी**

**चंद्रपूर मनपामध्ये कोणी शेण खाल्ले या भानगडीत संजय राऊत यांनी पडू नये. कारण 2019 मध्ये पहिल्यांदा शेण खाण्याचे काम संजय राऊत आणि उबाठाने केले होते. सत्ता आणि खुर्ची यासाठी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणे याला शेणखाने म्हणतात. ज्या बाळासाहेब ठाकरेंनी काँग्रेसचा कायम विरोध केला होता. आज तुम्ही काँग्रेस सोबत गेले, याला शेणखाने म्हणतात. चंद्रपूरमध्ये विकास आणि हिंदुत्वासाठी युती झाली आहे. तुमच्यासारखे अर्धामाची युती झालेली नाही. टोपलंभर शेण खाणाऱ्यांनी दुसऱ्यांवर टीका करू नये, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हंटले आहे.**



### संजय राऊत पाटकर फाईल आली तर तर तुम्हाला अवघड होईल!!

● नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत पाटकर फाईल आली तर तुम्हाला तोंड दाखवायला जागा मिळणार नाही. अलिबागमध्ये केलेले कारनामे जरा समोर येतील. काश्मीर फाईल, केरळ फाईलमध्ये या देशातील अन्यायाचे कथानक आहे.

● तर पाटकर फाईलमध्ये महिलांवर अन्यायाचे कथानक आहे. पाटकर फाईल आणि राऊतांचा काय संबंध हे जनतेला माहित आहे. तुम्ही एका महिलेला कसा त्रास दिला, हे जनतेला माहिती आहे. देशाने आणि महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला चले जाव म्हणत तुम्हाला हद्दपार केले आहे.

● जनतेने तुम्हाला नाकारत घरात बसवले आहे. त्यामुळे तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करू नये.

### ➤ परभणीत बाळासाहेब म्हणायचे, खान नाहीतर बाण निवडा, पण उबाठाने खान निवडला!!

● नवनाथ बन म्हणाले की परभणीमध्ये एकनिष्ठ शिवसैनिकाला महापौर केले, असा दावा जनाब संजय राऊत करतात. तुम्हाला एकही निष्ठावान मराठी माणूस भेटला नाही का ? तुमच्या नगरसेवकांपैकी एक ही माणूस तसा नव्हता का ? आमचा मुस्लिमांना विरोध नाही पण औरंगजेब फॅन क्लबचे काम जसे तुम्ही करत आहात त्याला आमचा विरोध आहे. तुम्ही औरंगजेबाची पिलावळ वाढवण्याचे काम करत आहात, त्याला आमचा विरोध आहे. तुम्ही औरंगजेब आणि अफजलखानाचा अजेंडा पुढे रेटत आहात. परभणीत बाळासाहेब म्हणायचे खान नाहीतर बाण निवडा, पण उबाठाने बाण बाजूला करत खान निवडला, हे महाराष्ट्र बघतो आहे.



### संजय राऊत यांनी किती कमिशन घेतले!!

● नवनाथ बन म्हणाले की, एकनाथ शिंदे भाजपसोबत आले त्यावेळी तुम्ही 50 खोके एकदम ओके, या घोषणा देत होतात. त्यावेळी तुम्हाला लाज वाटत होती का ? जेव्हा 50 खोक्यांचे आरोप केले त्यावेळी संजय राऊत तिथे पैसे मोजून देण्यासाठी बसले होते का ? असा टोला बन यांनी लगावला आहे.

● संजय राऊत यांनी पैसे मोजून देताना त्यातून वीस ते पंचवीस टक्के कमिशन घेतले होते का ? आज तुमच्यावर आरोप झाला तर तुमचा जळफळाट होतो. मग एकनाथ शिंदेंवर बिनबुडाचे आरोप केले त्याचे पुरावे द्या, त्यावेळी तुम्ही कमिशन घेतले, याचे उत्तर तुम्ही दिले पाहिजे.

## डिझेल गाड्या होणार बंद ? काय सांगतो नीती आयोगाचा अहवाल ?

➤ मुंबई : भारतात प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकार २०२७ पर्यंत १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये डिझेलवर चालणाऱ्या प्रवासी वाहनांवर बंदी घालण्याचा विचार करत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या समितीने या संदर्भात शिफारस केली आहे, ज्यामुळे डिझेल वाहनांचे उत्पादन आणि वापर टप्प्याटप्प्याने बंद होऊन इलेक्ट्रिक आणि सीएनजी वाहनांना चालना मिळण्याची शक्यता आहे.

भारताने २०७० पर्यंत 'शुद्ध-शून्य उत्सर्जन' लक्ष्य गाठायचे असेल, तर वाहतूक क्षेत्रात आमूलाग्र बदल अपरिहार्य असल्याचे नीती आयोगच्या ताज्या अहवालात स्पष्ट



करण्यात आले आहे. डिझेल वाहनांना टप्प्याटप्प्याने हटवून सीएनजी, हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वेगाने स्वीकार करणे ही पहिली आणि महत्त्वाची पायरी ठरेल, असे आयोगाने नमूद केले आहे. अहवालानुसार, शहरी प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी डिझेल वाहनांची संख्या कमी करणे आवश्यक आहे. त्याऐवजी सीएनजी, हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा. यासोबतच इथेनॉल मिश्रित इंधनावर चालणाऱ्या फ्लेक्स-फ्युएल वाहनांना, उच्च बायो-सीएनजी मिश्रणाला आणि हायब्रिड फ्लेक्स-फ्युएल मॉडेल्सना प्रोत्साहन देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

### आता पुढे काय बदलणार?


● **ग्राहकांसाठी** : आगामी काळात डिझेल गाड्यांची खरेदी महाग पडू शकते किंवा त्यांचे उत्पादन थांबविले जाऊ शकते,

● **पर्याय** : हायब्रिड आणि फ्लेक्स फ्यूल इंजिन असलेल्या गाड्यांकडे कल वाढणार.

**उद्योग** : ऑटोमोबाईल कंपन्यांना आता बॅटरी निर्मितीसोबतच हायड्रोजन आणि बायोगॅस तंत्रज्ञानावर गुंतवणूक करावी लागेल.

## मुंबईतील गोरेगावात ४५ मजली इमारतीला भीषण आग

मुंबई : मुंबईतील गोरेगाव परिसरात असलेल्या ४५ मजली इमारतीला भीषण आग लागली आहे. या इमारतीच्या नवव्या मजल्यावर अचानक आग भडकली आणि काही क्षणांतच धुराचे मोठे लोट संपूर्ण परिसरात पसरले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तात्काळ घटनास्थळी



दाखल झाल्या आहेत. आग लागल्याचे समजताच इमारतीतील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ● पान ३ वर...

## ट्रॅक्टर पलटी होऊन २८ वर्षीय तरुणाचा मृत्यु; हिवरा येथील घटना

➤ माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील हिवरा (बु.) येथे ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात २८ वर्षीय शेतमजूर तरुणाचा मृत्यु झाल्याची घटना गुरुवारी (दि. १२) पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गणेश भारत गाडे (वय २८) रा. हिवरा बु. ता. माजलगाव हे शेतमजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. गुरुवारी पहाटे सुमारे २ च्या सुमारास ते शेतातील कामासाठी ट्रॅक्टर घेऊन जात असताना शेतातील वळण रस्त्यावर ट्रॅक्टर वळविताना वाहनाचा तोल जाऊन ट्रॅक्टर पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टर त्यांच्या



अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविले; मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती मृत घोषित केले. या घटनेमुळे हिवरा (बु.) गावात शोककळा पसरली आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या तरुणाच्या अचानक निधनामुळे गाडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## पाकची पुन्हा नाचक्की; हॉटेलचे बिल न भरल्याने खेळाडू रस्त्यावर

➤ **पाकिस्तान** : पाकिस्तानी खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्तरावर नाचक्की झाली आहे. खेळाडूंच्या हॉटेलचं बिल न भरल्याने खेळाडूंना बराच वेळ रस्त्यावर बसून राहावे लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी हॉकी टीम ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा येथे आपल्या स्पर्धेसाठी गेले असताना ते ज्या हॉटेलमध्ये थांबणार होते त्या हॉटेलचं पाकिस्तान हॉकी फेडरेशनने बिल न भरल्यामुळे त्यांना तिथे प्रवेश नाकारण्यात आला.

होबार्ट येथे होणाऱ्या एफआयएच प्रो लीग स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पाकिस्तानी हॉकी संघ ऑस्ट्रेलियात आहे. पाकिस्तान संघाला प्रो लीगमध्ये आतापर्यंत खेळलेल्या सर्व म्हणजेच सहा मॅचमध्ये हार पत्करावी लागली आहे.

वृत्तानुसार, संघाला सांगण्यात आले की त्यांनी खेळाडू आणि व्यवस्थापन कर्मचाऱ्यांसाठी कॅनबेरा




येथील एका चार स्टार हॉटेलमध्ये खोल्या बुक केल्या आहेत आणि बिले भरण्यात आली आहेत. परंतु जेव्हा संघ आला तेव्हा त्यांना कळले की हॉटेलचं बिल भरलेलंच नाही, त्यामुळे त्यांचं बुकिंग रद्द झालं आहे. वेळेच्या फरकामुळे संघाचे प्रशिक्षक ताहिर जमान हॉकी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकले नाहीत.

काही तासांनंतर, हॉटेल कर्मचाऱ्यांनी अखेर थकलेल्या खेळाडूंना काही खोल्या दिल्या. फक्त काही खोल्या असल्याने, संघाला त्यानुसार खोल्या विभागून घ्याव्या लागल्या. दुसऱ्या दिवशी, पाकिस्तान संघाने पुन्हा संघ ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना २-३ ने गमावला.

काही स्थानिक पाकिस्तानी नागरिकांशी संपर्क साधल्यानंतर आणि त्यांनी आर्थिक मदत करण्यासाठी पुढे आल्यानंतर हॉकी संघाला अखेर हॉटेलचे बिल भरता आले, असे वृत्त आहे. आर्थिक कारणांमुळे संघाला फटका बसण्याची ही पहिलीच वेळ नाही. अहवालानुसार, अर्जेंटिनामध्ये झालेल्या FIH प्रो लीगच्या पहिल्या टप्प्यात, कथित 'निधीअभावी' खेळाडूंना त्यांचे दैनिक भत्तेही देण्यात आले नव्हते.




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्य सरकारचे टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशनसोबत सामंजस्य करार

मुंबई : राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गुरुवारी टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. आरोग्य, पोषण, जलसंधारण, ग्रामीण उपजीविका आणि एकात्मिक ग्रामविकास यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये या करारांमुळे व्यापक बदल घडतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कराराप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र देशाच्या प्रगतीमध्ये विविध क्षेत्रांत ठसा उमटवीत असून हा वेग कायम ठेवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून राज्याचे वेगाने परिवर्तन होईल, असे त्यांनी सांगितले. टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशनसोबत झालेल्या या करारांमुळे विविध विकास उपक्रम राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणा हे शासनाचे प्रमुख प्राधान्य आहे.

या भागीदारीमुळे विविध कल्याणकारी योजना अधिक परिणामकारक आणि लोकोपयोगी ठरतील. शासनाच्या योजना लोकचळवळीच्या स्वरूपात पुढे येत असून टाटा ट्रस्टच्या सहकार्याने विविध विभागांमार्फत सकारात्मक प्रभाव निर्माण करता येईल. समाजातील सर्व घटकांचे उत्पन्न वाढून जीवनमान उंचावण्यास या उपक्रमांची मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुर्धर आजारांवरील महागड्या उपचारांमुळे सामान्य नागरिकांना अडचणी येतात; मात्र राज्यात उपचाराअभावी कोणाचाही मृत्यू होऊ नये, अशी व्यवस्था उभारली जात आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री सहायता निधीत टाटा ट्रस्टचे मोठे योगदान असून त्यामुळे गरजू रुग्णांना ठोस आर्थिक मदत देणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.




### कराराचा उद्देश:

● या सामंजस्य करारांचा उद्देश तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'च्या माध्यमातून आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका क्षेत्रातील शासकीय प्राधान्यक्रमांना बळकटी देणे हा आहे. प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी समुदायांपर्यंत पोहोचविणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत करार करून गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत दुर्धर आजारांवरील सुलभ आणि कमी खर्चिक उपचार उपलब्ध करून देणे हेही या करारांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### फायदा काय होणार?

● करारांनुसार माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करण्यात येणार आहे. टेलिमेडिसिनसह विविध माध्यमांतून उपचार सुविधा उपलब्ध करून शहरी व दुर्गम भागांत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढविण्यात येईल. एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवेच्या माध्यमातून आपत्कालीन प्रतिसाद अधिक सक्षम केला जाईल.

● दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखणे, किशोरवयीन मुलांमधील कुपोषण व रक्तक्षय दूर करणे, गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' योजनांचे वितरण मजबूत करणे यावर भर दिला जाणार आहे.

● तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे तसेच मराठवाडा व विदर्भातील पाणीटंचाईग्रस्त भागांत मृद व जलसंधारण योजना राबविण्यात येतील.

● हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला चालना देणे, वनाधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे आणि आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता व उपजीविका यांचा समन्वय साधत एकात्मिक ग्रामविकास घडविणे हीही या करारांची व्याप्ती आहे.

### असे आहेत करार:

टाटा ट्रस्टसोबत शासनाने एकूण १२ सामंजस्य करार केले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी यांचा समावेश आहे.

तसेच नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन आणि मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्यासोबतही करार करण्यात आले आहेत. याशिवाय जलसंधारण विभागासोबत नाम फाउंडेशनचा स्वतंत्र करार करण्यात आला आहे.

# माध्यमिक विद्यालय मोरवडच्या प्रांगणात आनंदनगरीचा उत्सव; विद्यार्थ्यांनी अनुभवला खऱ्या कमाईचा आणि उद्योजकतेचा आनंद





➤ **हनुमंत मात्रे : वडवणी प्रतिनिधी मोरवड (ता. वडवणी जि. बीड) :**
राजे शिवछत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ, मोरवड संचलित कै. सुंदररावजी काका शेळके पाटील माध्यमिक विद्यालय, मोरवड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आनंदनगरी उपक्रमाने शाळेचे प्रांगण अक्षरश: आनंदनगरीने बहरून गेले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व्यवहारातून खऱ्या कमाईचा आनंद अनुभवत जीवनोपयोगी कौशल्यांचा अनोखा अनुभव घेतला.

या आनंदनगरीचे उद्घाटन प्रसंगी वडवणी तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या शाळेचे संस्थापक अध्यक्ष अनंत बप्पा शेळके पाटील यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा सरपंच ॲड राज पाटील, पुसरा गावचे सरपंच रामराव आण्णा सावंत, चेअरमन महादेव नाईकवाडे, उपसरपंच अशोक आप्पा निपटे, नेते महादेव सावंत, काका सावंत, पत्रकार अशोक फपाळ, ज्ञानेश्वर नाईकवाडे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार शाळेच्या वतीने कोषाध्यक्ष बबलू शेळके पाटील, मुख्याध्यापक वाघ सर तसेच सर्व शिक्षकवृंदांनी केला. मान्यवरांच्या स्वागतासाठी शाळेच्या प्रवेशद्वारावर आकर्षक अशी सुंदर कमान उभारण्यात आली होती, जी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वत: तयार करून आणलेले विविध खाद्यपदार्थ, किराणा साहित्य, भाजीपाला, कटलरी आदींची दुकाने थाटली होती. वडापाव, पावभाजी, भेळ, मिसळपाव, पुरी-भाजी, गरमागरम भजे, मसकापाव, समोसे, पाणीपुरी, जिलेबी, आईस्क्रीम, कुल्फी, पेप्सी, गाजर हलवा, पॅटीस, झुणका-भाकर, पिठलं-भाकर तसेच भारतातील विविध प्रांतांतील प्रसिद्ध पदार्थांची चव उपस्थितांना चाखता आली. शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी या पदार्थांची खरेदी करत विद्यार्थ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आनंदनगरी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, व्यवहारिक ज्ञान, आर्थिक साक्षरता, स्वावलंबन आणि उद्योजकतेची जाणीव यांना मोठी चालना मिळाली. हा उपक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या जीवनात उपयोगी पडणारा, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द करा - शिवाजी कुरे

माजलगाव / प्रतिनिधी :
सिटू संघटनेच्या वतीने देशव्यापी संप पुकारण्यात आलेला होता त्या संपात देशातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना सहभागी झालेल्या होत्या. त्या संपाचाच भाग म्हणून माजलगाव तहसीलवर सिटू संघटनेच्या वतीने संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला.

केंद्र सरकारने प्रचलित २९ कामगार कायद्याचे रूपांतर चार श्रमसंहिता कायद्यात केलेली आहे. नवीन श्रम संहिता ह्या संपूर्णपणे उद्योग धारजीने आणि भांडवलदाराच्या बाजूच्या असून कामगार विरोधी आहेत जुन्या कायद्यानुसार कामगारांना जे संरक्षण प्राप्त झालेले होते ते संपूर्ण नवीन कायद्यामधून नष्ट झालेली आहे त्यामुळे भारत देशातील संघटित क्षेत्रातील व असंघटित क्षेत्रातील संपूर्ण कामगार असुरक्षित झाला आहे त्याला विरोध करण्यासाठीच संघटनेने देशव्यापी आंदोलन पुकारले आहे.



यावेळी दिलेल्या निवेदनात संघटनेने म्हटले आहे की, कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द करा, सर्व योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतन प्रदान करा, मनरेगा कायदा पूर्ववतपणे चालू ठेवा, आशांनी ऑफलाइन काढलेल्या आयुष्यमान कार्डाचे तात्काळ पैसे देण्यात यावे, आशांना दरमहावेतन चिट्ठी देण्यात यावी, ग्रामरोजगार सेवकांचे थकीत मानधन तात्काळ वाटप करा, शालेय पोषण कामगारांना दहा महिन्याच्या ऐवजी संपूर्ण बारा महिन्याचे मानधन देण्यात यावे, निराधार वृद्धांचे पेन्शन दरमहा वेळेवर वाटप करण्यात यावे. या मोर्चात दत्ता डाके, शिवाजी कुरे, सय्यद रज्जाक, रामचंद्र चिंचाणे, रत्नाकर गोळेकर, उषा औसे, उर्मिला शेंडगे, अर्चना पांचाळ, बंडूराम गरड, मुसद्दीक बाबा, अशोक पोकळे, विनायक पौळ, मोहन जाधव, सुहास झोडगे, आसाराम राठोड, उपस्थित होते.

# लेखीका डॉ. छाया महाजन यांच्या 'माणसांच्या गोष्टी' कथासंग्रहास ज्येष्ठ कथाकार दि. बा. मोकाशी कथासंग्रह पुरस्कार

**कल्याण :** १६२ वर्ष अविरत वाचन सेवा देणाऱ्या जुन्या आणि प्रसिद्ध अशा कल्याण येथील सार्वजनिक वाचनालया तर्फे यंदा ज्येष्ठ कथाकार दि. बा. मोकाशी कथासंग्रह २०२५-२६ पुरस्कार 'माणसांच्या गोष्टी' या ज्येष्ठ लेखीका डॉ. छाया महाजन यांच्या कथासंग्रहास जाहिर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता सार्वजनिक वाचनालय, कल्याणच्या सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सार्वजनिक वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी केले आहे. कथा संग्रहास पुरस्कार जाहिर झाल्यानंतर डॉ. छाया महाजन यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.






### मानवी नात्यांची वीण उलगडून दाखवणाऱ्या कथा 'माणसांच्या गोष्टी'

● आपल्या अवतीभवती अनेक चेहेऱ्यांची, अनेक ढंगांची, अनेक वृत्ती-प्रवृत्तींची माणसं वावरत असतात. आयुष्याच्या लढाईत आपापल्या परीने सामोरे जाणारे हे चेहेरे... काही हरून गेलेले, काही पिचलेले, काही उमदे, काहीह नियतीशी तडजोड करणारे, तर काही लढायला उभे ठाकलेले....असे विविध चेहेरे या कथासंग्रहात आपल्याला भेटत राहतात....

● डॉ. छाया महाजन यांनी हे चेहरे विविध प्रसंगांतून, निवेदनातून आणि पात्रांमधून साकारले आहेत. रजनी, आसावरी, अमांडा, वसुधा, वच्छी अशा व्यक्तिरेखांमथून मानवी स्वभावाचे कंगोरे, त्याची जीवनावरची आसक्ती आणि नात्यांच्या गहिऱ्या छटा या कथासंग्रहात लेखिका सशक्तपणे रेखाटते, मानवी नात्यांची वीण उलगडून दाखवणाऱ्या पंधरा कथा म्हणजेच रोहन प्रकाशनचे कथासंग्रह....माणसांच्या गोष्टी....

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



## मोठेवाडी जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचा जल्लोष, स्नेह संमेलन उत्साहात

माजलगाव / प्रतिनिधी :

भरतनाट्यम्, कोळीगीते, कोकरू नृत्य, आदिवासी नृत्य, देशभक्तीपर गीतांवर नृत्य तसेच विविध वेशभूषा सादर करत तालुक्यातील मोठेवाडी सांस्कृतिक कार्यक्रम पीएमश्री जि .प .केंद्र प्रा .शाळेतील विद्यार्थ्यांनी ‘जल्लोष’ साजरा केला .मोठेवाडी शाळेने पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमांची कास धरली आहे . त्याचाच एक भाग म्हणून हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले . या संमेलनात प्रत्येक मुलाचा सहभाग कसा राहील, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले .

या संमेलनाला विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उपस्थित होते . विद्यार्थ्यांच्या दर्जेदार कला सादरीकरणाला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली . विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी असे कार्यक्रम वारंवार केले जावेत, अशी अपेक्षा गटशिक्षण अधिकारी रविंद्र महामुनी यांनी व्यक्त केली . सांस्कृतिक कार्यक्रम पीएमश्री जि प .के .प्रा . शा . बडिबाडी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी यांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंधुताई नाथा रासवे तर मंडळ अधिकारी लोभाजी भोरजे, ग्रामसेवक बिभीषण डोरले, सरपंच सत्यभामाबाई दळवी, उपसरपंच सुभद्राबाई अंगदराव खेत्री, माजी जि .प . सदस्य शिवप्रसाद खेत्री, मा .सरपंच अविनाश गोंडे, चेअरमण संभाजी चव्हाण, उपाध्यक्ष विलास खेत्री सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सतीश डोणे यांनी केले, स्वागत गीत वसंत टाकणखार व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक टि . एन . शिंदे यांनी केले उद्घाटनपर मार्गदर्शन मा . गटशिक्षणाधिकारी माजलगाव, लोभाजी भोरजे व अविनाशजी गोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सांस्कृतिक सूत्रसंचालन शिवाजी व्यवहारे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी श्रीमती रूपाली बडवे, श्रीमती मनीषा गुळवे यांनी विद्यार्थ्यांचे गीत बसवले . कार्यक्रमाचे आभार शिक्षक गेणु पवार यांनी मांनले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर .पी . राठोड, उत्तमराव ढवळे, शाळा व्यवस्थापन समिती व समस्त गावकरी यांनी सहकार्य केले .

## मुंबईतील गोरेगावात ४५ मजली इमारतीला भीषण आग



● पान १ वरून . . . काहींनी तातडीने जिन्यांचा वापर करून खाली धाव घेतली तर काहींना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले . सुरक्षारक्षक आणि स्थानिक नागरिकांनीही मदतकार्याला हातभार लावला . प्राथमिक माहितीनुसार, आगीचं नेमकं कारण अद्याप अस्पष्ट आहे . शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे . सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही .

# आमचा तपास यंत्रणांवर विश्वास नाही, फडणवीसांच्या विधानावर राऊतांचे जोरदार प्रत्युत्तर

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारीला विमान अपघातात निधन झाले . परंतु, आता त्यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार मंगळवारी, 10 फेब्रुवारीला सादर केलेल्या प्रेझेंटेशनमुळे हा अपघात नाही तर घात असल्याचा संशय बळावला आहे . त्यामुळे, आम्ही उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी रोहित पवारांनी केली आहे . परंतु, चौकशी होईपर्यंत वाट पाहावी आणि भारतीय तपास यंत्रणांवर अविश्वास दाखवू नका, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सांगण्यात आले आहे . ज्यानंतर, त्यांच्या या विधानाला आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे . आमचा तपास यंत्रणांवर विश्वास नाही, कारण त्यांनी भा**खाऊपणा केल्याचा घणाघात राऊतांनी केला आहे .

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गुरुवारी ( ता . 12 फेब्रुवारी ) प्रसार माध्यमांशी संवाद साधला . यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तपास यंत्रणांवर अविश्वास दाखवू नये, असे रोहित पवार यांना उद्देशून म्हटले . ज्याबाबत आता खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे . यावेळी त्यांनी म्हटले की, जे सरकार देश, भारत माता आपल्या स्वार्थासाठी आणि आपली चामडी वाचवण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्पच्या पायाशी गहाण ठेऊ शकते, तर ते सरकार काहीही करू शकते . आतापर्यंत मोदी आल्यापासून कोणत्याही घटनेचा तपास हा निष्पक्ष झालेला नाही . उलट तो तपास पक्ष :पाती झाला . भाजपच्या नेत्यांना सातत्याने क्लीन चिट देण्यात आली . जे जे इतर पक्षातील भ्रष्ट लोक त्यांच्या पक्षात गेले, तेव्हा त्यांना तिथे गेल्यावर क्लीन चिट देण्यात आली . घात – अपघात इतर प्रसंगांमध्ये तपास यंत्रणांनी भा**खाऊपणा केला आहे, असा घणाघात राऊतांनी केला .

तसेच, देवेंद्र फडणवीस जे म्हणत आहेत, की तपास यंत्रणांवर विश्वास ठेवा . तर,



नाही तुमच्या सरकारवर सुद्धा विश्वास नाही त्यामुळे तुमच्या तपास यंत्रणांवर सुद्धा विश्वास नाही . अहमदाबादच्या अपघाताचे काय झाले ? त्यात 300 च्या आसपास लोक मारले गेले . त्याचे काय झाले ? अहमदाबादमध्ये दोन सेकंदात विमान कसे पडले ? विमान अहमदाबादला पडले आणि अजित पवारांना घेऊन जाणारे विमान सुद्धा आदल्या रात्री गुजरातवरून आले होते . लोकांच्या मनात संशय येणारच . तुम्ही तपास यंत्रणांवर फाजील आत्मविश्वास दाखवू नका . न्यायालयापासून ते सर्व तपास यंत्रणा तुमच्या टाचेखाली आहे . हे संपूर्ण देशाला आणि जगाला माहीत आहे, मिस्टर फडणवीस असा प्रत्युत्तर राऊतांनी दिले .

तर, रोहित पवार यांनी मांडलेले जे मुद्दे आहेत, त्यांची स्वत : तुम्ही तपासणी केली पाहिजे . अजित पवार गेल्यानंतर त्यांचे मन भरून आले होते . मित्र गमावला म्हणून . मग त्याच अजित पवारांचा सख्खा पुतण्या एक प्रेझेंटेशन सादर करत आहे . त्यामध्ये काही तथ्य आणि सत्य दाखवत आहे, अपघातावर संशय का आहे त्याबाबत . मग हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य आहे की, रोहित पवारांनी जे प्रेझेंटेशन दाखवले, त्याबाबत त्यांच्याशी चर्चा करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांना तिथे बोलवणे, याला आम्ही नि :पक्षपणा बोलू . पण कोणी या अपघाताचे कोणी राजकारण करू नये, तपास यंत्रणा काम करत आहेत .

ही उडवाउडवीची उत्तरे आहेत . त्यांचे दु :ख हे ढोंग आहे, असा टोला खासदार संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीसांना लगावला आहे .

या अपघाताचे सत्य पवार कुटुंबीयांनी बाहेर काढले आहे . बुधवारी ( ता . 11 फेब्रुवारी ) सुनेत्रा पवार, त्यांची दोन मुले, प्रफुल पटेल, सुनील तटकरे हे मोदी – शहांना भेटले . त्याचे फोटो आले आहेत . बैठक चांगली झाली, हे फोटोवरून पाहायला मिळत आहे . रोहित पवारांनी दिलेल्या प्रेझेंटेशन संदर्भात महाराष्ट्रातून जो संशय व्यक्त करण्यात येत आहे . त्या संदर्भात त्यांनी देशाच्या पंतप्रधानांशी सुद्धा बोलायला हवे होते .

राजकीय चर्चा यापुढेही होत राहतील . पण गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान मोदी यांच्याशी प्रफुल्ल पटेल किंवा सुनेत्रा पवारांनी चर्चा केली असती तर कदाचित तपासाला गती आली असती, असे राऊतांनी म्हटले . पण आता या विषयावर चर्चा करणे थांबवायला पाहिजे . कारण या विषयाचा तपास करण्यासाठी रोहित पवार आणि पवार कुटुंब सक्षम आहे, असेही खासदार संजय राऊतांनी यावेळी स्पष्ट केले .

# धनुष्यबाण कोणाचे ? शिवसेना कुणाची ? सुनावणीची सर्वोच्च न्यायालयाची नवी तारीख

मुंबई : शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी जून 2022 मध्ये बंडखोरी करत शिवसेनेचे 40 आमदार फोडले होते . त्याला साडेतीन वर्षे झाली . त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी 2023 मध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती .

या याचिकेवर 18 फेब्रुवारी रोजी सुनावणी आहे . ही सुनावणी गेल्या आठवड्यात ( 21 जानेवारी ) होणार होती . मात्र, त्यावेळी सुनावणी न होता चार आठवड्यांनंतरची तारीख होईल, असे सांगितले होते . आता सर्वोच्च न्यायालयाने नवीन तारीख दिल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर नमूद केले आहे .

जून 2022 मध्ये शिवसेनेत फूट पडल्यापासून पक्ष आणि चिन्हाचा वाद सुरू आहे . एकनाथ शिंदे यांच्यानंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडून सत्तेत सहभागी होण्याचा




यांनी पक्ष फोडून पक्ष आणि चिन्हावर दावा करून कब्जा केल्याचा ठाकरे गटाचा दावा आहे .

पक्ष आणि चिन्हाचा वाद सर्वोच्च न्यायालयात सुरू असतानाच मे 2024 मध्ये लोकसभा आणि नोव्हेंबर 2024 मध्ये विधानसभेची निवडणूकक झाली .

तरीही पक्ष आणि चिन्हाचा निर्णय झाला नाही . गेल्या महिन्यात डिसेंबर 2025 मध्ये नगरपरिषद, नगरपंचायती तसेच जानेवारी 2026 मध्ये 29 महापालिकांच्या आणि फेब्रुवारीमध्ये 12 जिल्हा परिषदांसोबत 125 पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या . तरीही निकाल न लागल्याने शिंदेंच्या शिवसेनेने धनुष्यबाण आणि ठाकरेंच्या शिवसेनेने मशाल चिन्हावर निवडणुका लढवल्या होत्या . आता या प्रकरणावर 18 फेब्रुवारी रोजी सुनावणी अपेक्षित आहे .

## लोणावळातील लायन्स पॉइंट


● पान ४ वरून . . . एकदा खळबळ माजली आहे .

नेमकं काय घडलं ?

मिळालेल्या माहितीनुसार, वीरेंद्र सिंह ( ३४ ) असं मृत तरुणाचं नाव असून तो आयटी कंपनीत कार्यरत होता . पहाटे ४ : ३० च्या सुमारास लायन्स पॉइंटजवळ एक चारचाकी वाहन संशयास्पदरीत्या उभे असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले . वाहन चालकाचा शोध घेतला असता तिथे कोणीच दिसले नाही, त्यामुळे पोलिसांनी गाडी तपासली त्यात संबंधित मृत व्यक्तीचा फोन सापडला . वीरेंद्र याने आत्महत्या करण्यापूर्वी बायकोला आणि जवळच्या व्यक्तींना ई–मेल आणि मेसेजद्वारे आपण आत्महत्या करणार आहोत याचे संकेत दिले होते . यावरून पोलिसांचा संशय अधिक बळावला . स्थानिक पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली

पोलिसांनी शिवदुर्ग रेस्क्यू टीमच्या मदतीने मृतदेहाचा दरीत शोध घेतला . ज्या ठिकाणी गाडी उभी होती त्याच दिशेने २५० फूट खोल दरीत संबंधित व्यक्ती आढळून आली .

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| कु | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# तांत्रिक वेतनश्रेणीसह प्रलंबित मागण्यांसाठी भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

## माजलगाव भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा सहभाग; २ मार्चपासून बेमुदत कामबंदची चेतावणी





कास्ट्राईब संघटना आणि तांत्रिक संघटना यांच्या वतीने मा. उप अ भु अ माजलगाव यांना संपा बाबत निवेदन देण्यात आले

➤ **अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**

तांत्रिक वेतनश्रेणी तात्काळ लागू करणे, सुधारित आकृतीबंध मंजूर करणे, विभागाच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करणे आदी प्रलंबित मागण्यांसाठी 'भूमी अभिलेख कृती समिती, महाराष्ट्र राज्य'ने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, महसूलमंत्री, अपर मुख्य सचिव तसेच जमाबंदी आयुक्त यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. माजलगाव भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारीही या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वी विविध कर्मचारी संघटनांच्या वतीने सनदशीर मार्गाने लढा देण्यात आला. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई (नागपूर खंडपीठ) येथील मूळ अर्ज क्रमांक ४३६/२०१७ (पवनकुमार केवटे व इतर ९८) प्रकरणात दिनांक १४ जानेवारी २०२० रोजी आदेश देऊनही तांत्रिक वेतनश्रेणी अद्याप लागू करण्यात आलेली नाही.

तसेच जून २०२५ मध्ये महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत मागण्या मान्य करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, संबंधित कालावधी उलटूनही मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांत नाराजी व्यक्त होत आहे. शासन स्तरावर वेळकाढूपणा व दबावतंत्र वापरले जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या निवेदनावर कृती समितीचे सुनील गोडसे, विभूतीचंद्र गजभिये, पवन केवटे, राहुल पाटील, किशोर इंगळे, दीपाली मुरकुटे, सूरज रामटेके, विवेक कोठाळे, कमलाकर पोतदार, संजय बोर्डे आणि अभय पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचा पाठिंबा :

● कास्ट्राईब भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेनेही या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. संघटनेचे सरचिटणीस आर. एम. कांबळे व मुख्य संघटन सचिव नुपम मेढे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे २ मार्चपासूनच्या कामबंद आंदोलनात सहभागी होणार असल्याचे कळवले आहे.

### हक्कासाठी एकत्रित लढा :

● न्याय्य मागण्यांसाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी एकत्र येत 'भूमी अभिलेख कृती समिती'ची स्थापना केली असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे

### प्रमुख प्रलंबित मागण्या पुढीलप्रमाणे

● मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवासभत्ता मंजूर करून तो वेतनात समाविष्ट करावा. ● इतर विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची बदली अथवा प्रतिनियुक्ती टाळावी. ● भूमी अभिलेख विभागाच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करावा. ● नियुक्ती प्राधिकाऱ्यांची परवानगी व चौकशीशिवाय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची पद्धत बंद करावी. ● शासकीय सुट्टीच्या दिवशी अपवाद वगळता कामकाज करू नये. ● अतिरिक्त काम केल्यास नियमानुसार मोबदला द्यावा.

### जमाबंदी आयुक्त कार्यालयावर मोर्चा

● कृती समितीने जाहीर केलेल्या आंदोलनाच्या टप्प्यांनुसार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणी साहित्य कार्यालयात एकत्र येऊन काळ्या फिती लावून केवळ नियमित कामकाज करण्यात येणार आहे. २० फेब्रुवारीपासून कामबंद ठेवून निषेध नोंदवण्यात येईल. २३ ते २६ फेब्रुवारीदरम्यान सामूहिक रजा आंदोलन केले जाईल.

● २७ फेब्रुवारी रोजी जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे येथे आक्रोश मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास २ मार्च २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येईल.

## विशेष



# लासूरला माता रमाई यांची 128 वी जयंती जल्लोषात साजरी

## भीमक्रांती युवा प्रतिष्ठानतर्फे केले आयोजन भीमसैनीकांची उपस्थिती



गंगापूर : गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे माता रमाई यांची 128 वी जयंती जल्लोषात साजर करण्यात आली.

दरम्यान देवगाव रोडवरील सिरसाठ कॉलनी येथे भीमक्रांती युवा प्रतिष्ठानतर्फे फुलांनी सजवलेल्या रथात माता रमाई यांच्या प्रतिमेला समस्त महिला व पुरुष भीमसैनिकांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले त्यानंतर ढोल तासे व डीजेच्या गजरात मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला अशोक कॉलनी, माँसाहेब जिजाऊ स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, मुख्य रस्ता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या मार्गाने मिरवणूक निघून गावातील सर्व महापुरुषांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून फटाक्याची आकर्षक आतिशबाजी करण्यात आली यावेळी लासूर स्टेशन, दायगाव, भानवाडी, सावंगीसह पंचक्रोशीतील भीमसैनिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



# थेटेगव्हाण आश्रम शाळेमध्ये पुढारी टॅलेंट सर्च परीक्षा संपन्न

➤ **धारूर** : स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये आदिवासी समाजातील विद्यार्थी सुद्धा..! या स्पर्धेमध्ये टिकले पाहिजेत आणि त्यांनी सुद्धा एक गरुड झेप घेऊन यशस्वीरित्या अनेक विविध पदावर विराजमान होण्यासाठी बालवयातच स्पर्धा परीक्षांचे धडे, त्याचबरोबर त्या स्पर्धांचे स्वरूप (बुद्धिमत्ता, गणित, चालू घडामोडी) विविध प्रकारचे असणारे विषय, त्याचप्रमाणे उत्तरासाठी असणारे चार बहुपर्यायी याचे सखोल ज्ञान व्हावे आणि स्पर्धा परीक्षेची गोडी रुची विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊन आदिवासी समाजातील विद्यार्थी स्पर्धा स्पर्धेसाठी तयार झाला पाहिजे..! या उद्देशाने "एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर व दैनिक पुढारी" यांच्या संयुक्त विद्यमानाने टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम, श्री भागवत कदम सहाय्यक, श्री डॉ.उद्धवजी वायाळ सहाय्यक प्रकल्प अधिकारी, यांच्या संकल्पनेतून. तसेच दै.पुढारी व्यवस्थापक श्री.अमोल कोल्हे साहेब व समन्वयक श्री राजेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाने, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत "शासकीय माध्यमिक आश्रमशाळा थेटेगव्हाण (कॅम्प कांदेवाडी) ता. धारूर जि.बीड या शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर" यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रमुख श्री.मारुती राठोड सर, श्री परमेश्वर तावसे सर यांच्या नेतृत्वाखाली दै. पुढारी टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. पर्यवेक्षक म्हणून श्री.गोरक्षनाथ अबुज सर, श्री शिवाजी गांधले सर, श्री.नागनाथ भरडे सर, श्रीमती शकुंतला गायकवाड मॅडम यांनी जबाबदारी पार पाडली. तसेच शाळेमधील श्री.व्ही व्ही कुलकर्णी, श्री. संभाजी मुसळे, श्री राहुल करे इतर सर्व शिक्षकांनी सुद्धा परीक्षा यशस्वीरित पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेतले.

## परळीत होणा-या महापशूधन एक्स्पोस उपस्थित रहा - अरूण राउत



➤ **माजलगाव** : प्रभू वैद्यनाथच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशु प्रदर्शनाचे उद्घाटन दि. १३ शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार असुन याला माजलगाव शहरासह तालुक्यातील पशुपालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे राज्य परिषद सदस अरूण राउत यांनी केले आहे.

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दि.१३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विवीध प्रजातींचे एक हजाराहुन अधिक पशु सहभागी होणार असुन प्रदर्शनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे तर दि. १४ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पोस माजलगाव शहरासह तालुक्यातील पशुपालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे राज्य परिषद सदस्य अरूण राउत यांनी केले आहे.

# ईगलवूड पॉलिटेक्निकचा दुहेरी मानाचा तुरा;

## हिवाळी परीक्षेत उज्ज्वल यश, IDSSA वॉलीबॉलमध्ये विजेतेपद





➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

येथील ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे. हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले असून, IDS-SA अंतर्गत झालेल्या विभागीय आंतरमहाविद्यालयीन वॉलीबॉल स्पर्धेतही दमदार कामगिरी नोंदवली आहे.

हिवाळी परीक्षा २०२५ चा निकाल समाधानकारक लागला असून सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelli-gence) शाखेतील धनावडे ऋतुजा हिने ८८.७१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत नवा उच्चांक प्रस्थापित केला. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेतील मदने आरती हिने ८८ टक्के गुणांसह यश मिळवले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील प्रगती मेंडके हिने ८०.९४ टक्के गुण मिळवले, तर सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील जयवर्धन सोनवणे याने ८१.११ टक्के गुणांसह उल्लेखनीय कामगिरी केली.

शैक्षणिक यशाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही महाविद्यालयाने आपली ताकद सिद्ध केली. IDSSA विभागीय वॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलांच्या संघाने उपविजेतेपद मिळवले. मुलींच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत शिस्तबद्ध व समन्वयपूर्ण खेळ करत प्रत्येक सामन्यात वर्चस्व राखले. अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत त्यांनी विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुलांच्या संघानेही कठीण प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध जिद्दीने खेळ करत अंतिम फेरी गाठली.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, क्रीडा शिक्षक सुलतान सर तसेच प्राध्यापक व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या सर्वांगीण यशामुळे संस्थेतील शैक्षणिक गुणवत्ता व क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षण व क्रीडा क्षेत्रात प्रगतीची प्रेरणा मिळाली असून भविष्यात आणखी उल्लेखनीय कामगिरी होईल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप, शाळेला खुर्च्यांची सप्रेम भेट



➤ **कन्नड : विशाल भालेराव**

कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण वातावरणात निरोप समारंभ पार पडला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत आठवण म्हणून खुर्च्यांची सप्रेम भेट दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी सबाहत मॅडम, प्राचार्य संतोष मतसागर, राजू अवचार, केंद्रप्रमुख कैलास लाडके, साधनव्यक्ती संदीप कुलकर्णी, विनोद राठोड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक के. जी. निकम, ए. पी. चव्हाण, रावसाहेब निकम, संजय शिरसाट तसेच वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव यांची उपस्थिती लाभली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. इयत्ता दहावीतील आदर्श विद्यार्थी म्हणून यशवंत संजयकुमार काळे, साक्षी विजय राठोड व सोनिया आजिनाथ गायके यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान साक्षी काळे, तनवी आढाव, अक्षर तांबट, अंजली निकम, अक्षरा मुरकुंडे व साक्षी राठोड या विद्यार्थिनींनी भावपूर्ण मनोगत व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या मनोगतातून शाळेतील आठवणी, अनुभव व भविष्यासाठीच्या अपेक्षा प्रकट झाल्या.

मार्गदर्शन करताना प्राचार्य संतोष मतसागर यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. राजू अवचार सर यांनी गीतातून विद्यार्थ्यांना संदेश देत आई-वडील व गुरुजनांचा सन्मान करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात सागर जाधव यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, मित्र निवडताना काळजी घेण्याचे व येणाऱ्या आव्हानात्मक काळात सजग राहण्याचे आवाहन केले. तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक के. जी. निकम, ए. पी. चव्हाण व संजय शिरसाट यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मनोगत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनान्से यांनी प्रभावीपणे केले, तर पर्यवेक्षक गणेश डव्हारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला असून, शाळेशी असलेले नाते अधिक दृढ करणारा ठरला.

## लोणावळातील लायन्स पॉइंट परिसरात पुन्हा आढळला मृतदेह; पोलिस तपास सुरू

लोणावळा : पुण्यातील लोणावळा हे ठिकाण महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांपैकी एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे, पण हेच ठिकाण सध्या एकामागोमाग एक घडणाऱ्या आत्महत्यांच्या घटनांमुळे हादरून गेले आहे.

मागे मुंबईतील कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या मुलीने या ठिकाणी आत्महत्या केली होती आणि आता लोणावळ्यातील लायन्स पॉइंट परिसरात गुरुवारी सकाळी एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने पुन्हा ● पान ३ वर...

# वेदांत इंग्लिश स्कूलच्या बाल कलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली






➤ **केज/प्रतिनिधी** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञानाबरोबरच खेळ आणि खेळाबरोबरच कला यामधूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडत असतो. शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन हे भविष्यातील मोठ्या कलाकाराचे पहिले कला व्यासपीठ असते.

नुकताच पार पडलेल्या वेदांत इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन मध्ये बालकांनी अतिशय...! एकापेक्षा एक कलाविष्काराचे अप्रतिम असे सुरेख सादरीकरण करून, समोरील प्रेक्षक रसिकांची मने जिंकली. केज येथील अहिल्यानगर मधील वेदांत इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साही वातावरणामध्ये पार पडला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून हरुणभाई इनामदार, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून केज नगर पंचायतचे नगरअध्यक्ष मा.सीता ताई बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री केशव महाराज शास्त्री श्रीकृष्ण आश्रम केज, श्री मदने महाराज, श्री विष्णु महाराज, श्री स्वप्निल उनवणे पोलीस निरीक्षक केज, श्री संतोष मेघने एपीआय पोलीस स्टेशन केज, श्री रमाकांत मुंडे जि.प सदस्य, श, श्री बाळासाहेब गाढवे, नगरसेवक केज, श्री राहुल वाव्हळ, श्रीराम रोडे, श्री वासुदेव मुंडे साहेब व्यवस्थापक कृष्णा अर्बन बँक केज, श्री संजय डोळे शाखा अधिकारी कृष्णा अर्बन बँक केज, श्री प्रशांत वाघमारे सर, महादेव ढाकणे सर, श्री शिंपले मामा, श्रीमती मालती वावळे यांच्यासह आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि विविध प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. बालकलाकारांनी वेगवेगळ्या भूमिकेतून सादर केलेली कला उपस्थित प्रेक्षक रक्षकांची मने जिंकून घेत. बालकलाकारांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. तत्पूर्वी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे ही आमची सामाजिक बांधिलकी असून यासाठी वेदांत इंग्लिश स्कूलची सर्व टीम विद्यार्थी हाच केंद्रबिंदू समोर ठेवला ज्ञानदानाचे कार्य, गुणवत्ता पूर्ण विद्यार्थी घडवण्यासाठी वचनबद्ध...! राहून. आमच्यावर पालकांनी टाकलेल्या विश्वासास कदापिही तडा जाऊ न देता...! सदैव पात्र राहण्यासाठी कार्य करू..अशी हमी वेदांत इंग्लिश स्कूलचे संचालक श्री सखाराम वनवे सर, श्री बंडू घुले सर त्याचबरोबर मुख्याध्यापिका शितल लांडगे मॅडम या सर्वांनी प्रस्ताविक करताना शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली करताना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रोडे मॅडम व श्री दत्तात्रेय मुजमुले यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले संचालक श्री सखाराम वनवे यांनी शाळेच्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी केलेले डान्स व शिक्षक कर्मचाऱ्यांनी घेतलेली मेहनत याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. उपस्थित सर्वांचे आभार श्रीमती गायकवाड मॅडमयांनी मानले. या कार्यक्रमासाठी वेदांत इंग्लिश स्कूलचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी या सर्वांनी परिश्रम घेतले.